**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते यंदाचे प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान
- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सुपोषित ग्राम योजनेचा प्रारंभ
- राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन उद्यापासून अकोल्यात भरणार
- बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात दिवसअखेर ऑस्ट्रेलियाच्या  ६ बाद ३११ धावा

  **आणि**
- ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मल्याळी लेखक एम टी वासुदेवन नायर यांचं निधन

**<><><><><>**

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचं आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते नवी दिल्लीत समारंभपूर्वक वितरण करण्यात आलं. कला तसंच संस्कृती, धाडस, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक सेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा विविध सात श्रेणींमध्ये १७ बालकांना असाधारण कामगिरीसाठी हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात मुंबईची १३ वर्षीय केया हटकर आणि अमरावतीच्या १७ वर्षीय करिना थापा हिचा समावेश आहे.  केया हटकर, डान्सिंग ऑन माय व्हील्स आणि आय एम पॉसिबल या दोन बेस्टसेलर पुस्तकांची लेखिका आहे. तिला कला आणि संस्कृती क्षेत्रातील कामगिरीसाठी पुरस्कृत करण्यात आलं. करिना थापाला तिच्या धाडसाबद्दल राष्ट्रीय बाल पुरस्कारानं गौरवण्यात आलं. तिनं अतुलनीय

प्रसंगावधान दाखवत आगीतून गॅस सिलेंडर बाहेर काढून तब्बल ३६ जणांचे प्राण वाचवले होते. या बालकांचे साहस अद्वितीय असून भारतीयांसाठी प्रेरणादायी असल्याचं राष्ट्रपती याप्रसंगी म्हणाल्या....

**बाईट - राष्ट्रपती मुर्मू.**

शीख धर्मियांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंह यांचे दोन पुत्र, बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंह यांच्या बलिदानाचं स्मरण करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

**<><><><><>**

वीर बालदिवस हा देशातल्या नागरिकांसाठी राष्ट्रीय प्रेरणा दिवस असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. देशापुढं इतर काहीही महत्त्वाचं नाही हीच साहेबजाद्यांच्या बलिदानाची शिकवण असल्याचं ते म्हणाले....

सुपोषित ग्राम पंचायत योजनेचा प्रारंभ प्रधानमंत्र्यांनी यावेळी केला. पोषण आहाराशी संबंधित सेवा सुविधा सामाजिक योगदानातून ग्रामपंचायत पातळीवर उपलब्ध करुन देणं हे या अभियानाचं उद्दिष्ट आहे.

वीर बालपुरस्कार विजेत्या मुलांशी या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी संवाद साधला. तसंच नंतर झालेल्या संचलनाला हिरवा झेंडा दाखवला. आणि मानवंदना स्वीकारली. विविध राज्यांच्या पारंपरिक समृद्धीचं दर्शन घडवणारी वेशभूषा केलेल्या मुलांची पथकं आणि चित्ररथ या संचलनात सहभागी झाले

होते. देशभरातून सुमारे तीन हजाराहून अधिक मुलं या सोहळ्यात सहभागी झाली होती.

सांगली शिक्षण संस्थेच्या पथकानं महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करत लेझीम कलाप्रकाराचं प्रात्याक्षिक सादर केलं. संस्थेतल्या १८ विद्यार्थिनी सह ४ वादक, १ व्यवस्थापक आणि १ संघ प्रमुख अशा २४ जणांच्या संघाने हे प्रात्यक्षिक यशस्वी केलं.

वीर बाल दिनानिमित्त देशभरांत विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. MyGov आणि MyBharat पोर्टलद्वारे ऑनलाइन प्रश्नमंजुषा तसंच इतर स्पर्धांची मालिका आयोजित करण्यात येणार आहे. शाळा, बाल संगोपन संस्था आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये कथाकथन, निबंधस्पर्धा आदी अनेक उपक्रम राबवले जाणार आहेत.
या बाल वीरांच्या स्मृतीला देशात सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साहेबजादे यांच्या प्रतिमेला फुलं अर्पण करून अभिवादन केलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय आयुष अभियानामुळे देशवासियांना पारंपरिक पद्धतीवर आधारित आरोग्य सेवा आणि वैद्यकीय उपचार वाजवी दरात उपलब्ध झाले असल्याचं केंद्रीय आयुष राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय आयुष मिशन अंतर्गत समग्र स्वास्थ्य सेवा या चित्रपट मालिकेचं जाधव यांनी काल दिल्लीत अनावरण केलं, त्यावेळी ते बोलत होते. ही मालिका राष्ट्रीय आयुष

मिशनची उल्लेखनीय प्रगती आणि परिवर्तनकारी परिणामांवर प्रकाश टाकते, आजारांना प्रतिबंध करून, निरोगी जीवनाला चालना देण्यात आयुष मंत्रालयाची भूमिका यातून विशद होत असल्याचं, जाधव यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

देश आज शहीद उधमसिंग यांची १२५ वी जयंतीनिमित्त त्यांच स्मरण करत आहे. शहीद उधमसिंग यांनी स्वातंत्र्यलढ्यात जालियानवाला बाग हत्याकांड घडवणाऱ्या जनरल ओडवायरची हत्या केली होती. देशातल्या तीन प्रमुख धर्मांमधली एकता दाखवण्यासाठी त्यांनी ब्रिटीशांच्या कोठडीत असताना राम मोहम्मद सिंग आझाद हे नाव धारण केलं होतं.

**<><><><><>**

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अकोल्यात राज्यशासनाचा कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेच्या संयुक्त विद्यमाने उद्यापासून येत्या २९ डिसेंबरपर्यंत राज्यस्तरीय  कृषी प्रदर्शन अकोला इथं भरवण्यात येणार आहे.  प्रदर्शनाचं  उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह अन्य मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या प्रदर्शनात फळबाग, भाजीपाला, फुलशेती, वनौषधी, कापूस, ज्वारी, गहू, कडधान्य, तेलबिया, पाणलोट विकास, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, कृषी अभियांत्रिकी आणि अवजारांच्या दालनांसह राज्याच्या कृषी विभागाची,

इतर कृषी विद्यापीठांची, संलग्न कृषी संस्थांची तसंच शासनाच्या इतर विभागांची दालनं असणार आहेत.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये पूंछ इथं मंगळवारी झालेल्या एका अपघातात शहीद झालेल्या जवानांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. या अपघातात शहीद झालेल्या महाराष्ट्रातल्या दोन जवानांच्या कुटुंबांना राज्य सरकारच्या वतीनं १ कोटी रुपये आर्थिक मदत आणि इतर लाभ देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

मराठा रेजिमेंटचे नायक शुभम समाधान घाडगे हे सातारा जिल्ह्यातल्या कामेरी इथले तर, सिपॉय अक्षय दिगंबर निकुरे हे चंद्रपूर जिल्ह्यातल्या पिंपळगाव इथले रहिवासी आहेत.

**<><><><><>**

एप्रिल ते आक्टोबर २०२४ च्या कालावधीत निर्यात क्षेत्रात अमरावती विभागात बुलढाणा जिल्हा अव्वल ठरला आहे यंदाच्या या काळात बुलढाणा जिल्ह्यात ४६५ कोटी पेक्षा जास्त रुपयांच्या उत्पादनाची निर्यात झाली आहे.

जिल्ह्यातून सेंद्रिय रसायने रासायनिक उत्पादने साबण अभियांत्रिक उत्पादने तृणधान्य, दागिने,सोयाबीन, संबंधित उत्पन्न बियाणे भाज्या,आणि कापूस, आणि गाठींची निर्यात होते

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज मेलबर्न इथे सुरू झाला. यजमान ऑस्ट्रेलियाने नाणेफेक

जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाकडून सॅम कोन्टास, उस्मान ख्वाजा आणि मार्क्स लाबुशेन यांनी अर्धशतकी खेळी केली. पाच सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येक एकेक सामना जिंकला आहे. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ६ बाद ३११ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रसिद्ध मल्याळी लेखक एम टी वासुदेवन नायर यांचं काल रात्री केरळमध्ये कोझिकोड इथं निधन झालं. त्यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी कोझिकोड इथल्या मावूर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. केरळ सरकारनं त्यांच्या निधनानंतर राज्यात आज आणि उद्या दोन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नायर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

भारताच्या दक्षिण किनाऱ्यावर २६ डिसेंबर २००४ रोजी आलेल्या त्सुनामीला आज २० वर्षे पूर्ण झाली. या त्सुनामीमुळे तामिळनाडु आणि पुद्दुचेरीमध्ये हजारो लोकांचा मृत्यू झाला होता. इंडोनेशियातल्या सुमात्रा बेटांजवळ ९ पूर्णांक १ रिक्टर स्केलच्या भूकंपांमुळे आलेली त्सुनामी, ही इतिहासातल्या सर्वात भीषण नैसर्गिक आपत्तींपैकी एक आहे.

**//<><><><><>//**